
जन वाचन आंदोलन



जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आज गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोहचल नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किंमती परवडत नाहीत. अशा नववाचकांपर्यंत पुस्तके पोहचविण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समितीने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किंमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

या आंदोलनातून काय साध्य होईल ?

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. साक्षरता आंदोलनातून हस्तगत केलेली अक्षरकौशल्ये लोक स्वत: विकसित करू शकतील. त्यांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.

देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.आपणही सामील व्हा!

भारत ज्ञान विज्ञान समुदाय

मूल्य - २५ रू.

पंडिता रमाबाई



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

पुस्तकाचे नाव : पंडिता रमाबाई

लेखक : विनया मा.ह. / नीलिमा देशपांडे

द्वितीय आवृत्ती

जवाआं/२९

प्रकाशन : ऑगस्ट २०२३

बालवाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समुदाय तर्फे चालवल्या जात असलेल्या जनवाचन आंदोलन मोहिमेसाठी प्रकाशित.
या प्रकाशनांचा उद्देश लोकांमध्ये आणि मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणं हा आहे.

मूल्य : २५ रुपये

प्रकाशक : संतोष विठ्ठल शेंडकर
सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
३०५, आधार अपार्टमेंट, नारायण पेठ,
पुणे - ४११०३०
ई-मेल : mahabgvs@gmail.com

अक्षर जुळणी : भारती जाधव
मुद्रण : संकेत ऑफसेट, करंजेपुल

पंडिता रमाबाई

जुलै १८७८. मुंबईच्या एका वर्तमानपत्रात एक बातमी छापली होती. एक २० वर्षांची तरुणी संस्कृतमध्ये घडाघडा भाषण देते. इतकेच नव्हे तर तिचे भागवत पुराण, भगवदगीता असे सर्व मिळून अठरा हजार श्लोकांचे पाठांतर आहे. अतिशय गोड आवाजात लोकांसमोर धीटपणे ती हे श्लोक म्हणून दाखवते.

ही बातमी घरोघरी चर्चेचा विषय झाली.

आज महिला डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, कलेक्टर होतात. त्यामुळे त्यात काय एवढं? असं हे वाचून वाटेल, परंतु १००-१२५ वर्षापूर्वी स्त्रियांना लिहा-वाचायला बंदी होती. त्यांना घराबाहेर पडता येत नसे. त्याकाळात त्या तरुणीबद्दल सर्वांना नवल वाटू लागले. सर्व समाजात कुतूहल जागे झाले. कोणाची मुलगी? कुठून आली? दिसायला, वागायला कशी आहे? तिचं नाव काय?

तर अशा ह्या विद्वान गुणी मुलीचं नाव होतं रमा.

रमाचा जन्म १८५८ साली कर्नाटकातील मंगरुळ जिल्ह्यात गंगमूळ येथे झाला. त्यांच्या वडिलांचं नाव अनंतशास्त्री डोंगरे. अनंतशास्त्रींनी आपल्या बायकोला संस्कृत शिकवले. मुलीला त्यांच्या बायकोनं आणि त्यांनी मिळून शिकवले. त्यासाठी त्यांनी पंडितांशी वाद घातले. बायकांना शिकवणे हा गुन्हा नाही हे पटवून दिले. तरीदेखील समाजाने त्यांना खूप त्रास दिला. या त्रासाला कंटाळून गंगमूळ येथे जंगलाजवळ त्यांनी दहा वर्षे काढली. त्यानंतर घरातील मालमत्तेवरुन वाद झाल्यामुळे तेही घर सोडले.

मग त्यांनी लहान मुलांना घेऊन तिर्थयात्रा सुरू केली. दानधर्म करत या गावाहून त्या गावी पायी फिरले. शेवटी जवळची पुंजी संपली. त्यावेळी रमा ९-१० वर्षांची असेल. वडील वारले. भिकेकंगाल अवस्थेत राहायची पाळी आली. आईला उपासामुळे तापात मृत्यू आला. समाजाने बहिष्कार टाकल्याने आईच्या तिरडीला खांदाही रमालाच द्यावा लागला. काही दिवसातच बहिणही वारली. लहान वयात किती आघात झाले. दुःख, अपमान सर्व पचविले. आता फक्त दोघेच उरले. रमा आणि तिचा भाऊ. पण दोघेही डगमगले नाहीत. कामधंदा शोधत वणवण भटकले. मद्रासपासून कलकत्त्यापर्यंत. तिर्थक्षेत्रावर पंड्यांचे वाईट अनुभव आले. त्यांची गुंडगिरी पाहिली. देवदासी प्रथा पाहिली. महिलांची स्थिती पाहिली. दरमहा चार रुपये मजुरीवर अधूनमधून भावाला काम मिळे. बाकी उपासमार चाले. एकदा तर पंजाबमध्ये नदीकाठी थंडीपासून बचाव करण्यासाठी रात्रभर वाळूत गाडून घेतले. असे करत करत कलकत्त्याला ते १८७८ साली येऊन दाखल झाले.

रमा झाली पंडिता रमा

रमाबाई नदीकाठच्या देवळात बसून आवाजात अभंग म्हणत. ते ऐकून लोक जमत. हळूहळू रोजचा हा क्रमच झाला. सकाळ, संध्याकाळ लोक जमू लागले. रमाबाईने मग लोकांना गोष्टी सांगण्यास सुरुवात केली. जुन्या काळातील स्त्री कशी स्वतंत्र विचारांची होती हे त्या सांगत. द्रौपदी पित्याबरोबर दरबारात बसत असे. श्रीकृष्ण मातेबरोबर दरबारात जात असे; अशी उदाहरणे देऊन लोकांना पटवत असे. बंगालमध्ये त्यावेळी पड्दयाची चाल होती. त्यावर त्या टीका करत. स्त्रियांना शिकवले व बालविवाह थांबवले तर त्या भ्रष्ट होतील हे खोटे आहे असे त्या सांगत. आपल्या संस्कृत ज्ञानाने, धिटाईने, गोड बोलण्याने सर्वांना त्यानी प्रभावित



केले. त्यानंतर राजा राममाहेन रॉय इ. सुधारक विद्वानांनी त्यांचा सत्कार करायचे ठरवले. त्यांच्यावर पंडितांनी श्लोक रचले. प्रत्यक्ष सरस्वती अवतरली असे तिचे वर्णन केले. लगेच तिथे श्लोक रचून त्याला रमाबाईंनी उत्तर दिले, "मी एक साधी उपासक आहे. विद्वानांच्या या शहरात येऊन माझे सार्थक झाले." तेव्हापासून लोक त्यांना पंडिता रमाबाई म्हणू लागले. हीच ती वरील बातमी होय.

पंडिता म्हणून संबोधली गेलेली रमाबाई ही पहिली स्त्री.

कलकत्त्यातील महिलांनी पण त्यांचा गौरव केला. उच्च शिक्षणाने महिलांची मने किती अलंकृत होतात. तुम्ही विद्वान असून नम्र आहात. तुमचा स्वभाव सरळ सात्विक आहे. तुमच्यामुळे इथल्या देशबांधवांची स्त्रियांकडे बघण्याची दृष्टी सुधारेल. आम्हाला विद्वान महिलांची उदाहरणे देताना परदेशी महिलांची नावे आता घ्यावी लागणार नाहीत. असे उद्गार कलकत्त्यातील महिलांनी काढले.

इथेच रमाबाईंनी ऋग्वेद व उपनिषद यांचा अभ्यास केला. त्यांनी इतर मूर्तीपूजा सोडून दिली. अंत्यविधीच्या वेळच्या व तिर्थक्षेत्रावरच्या अनुभवामुळे हिंदू धर्मावरचा त्यांचा विश्वास उडाला. पण ईश्वरावरील श्रद्धा कमी झाली नाही. त्या एकेश्वरवादी बनल्या.

ही ब्राह्मणकन्या इतकी वर्षे अविवाहित कशी? रिकामटेकड्या माणसांनी बऱ्याच खोडसाळ गोष्टी रचल्या. तिच्या पत्रिकेत वैधव्य असल्यामुळे तिचे लग्न विठोबाबरोबर लावून दिले अशा अफवा पसरल्या. परंतु पत्रक काढून रमाबाईंनी त्याला उत्तर दिले. वडिलांचा पत्रिकेवर विश्वास नव्हता. भूत, खेत, ग्रह, देवतांचा कोप यावरही विश्वास नव्हता, तरी लोकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे पत्रकात स्पष्ट केले.

आता त्यांना कलकत्याबाहेरही आमंत्रणं येऊ लागली. ढाक्क्याला एका सभेत त्यांनी सांगितले की, शरीरात रक्ताचा थेंब असेपर्यंत महिलांच्या उन्नतीसाठी काम करेन. असाच सिल्हट गावी एक कार्यक्रम होता. इथे त्यांची बिपीन मेधावी यांच्याशी ओळख झाली. मेधावी हे गरीब बंगाल कुटुंबातील. नोकरी करून ते शिकले. एम.ए. व पुढे वकील झाले. ते वकिली करत. दिसायलाही मोठे रुबाबदार. त्यांना संगिताची आवड होती.

याच दिवसात रमाबाईवर आणखी एक संकट कोसळले. त्यांचा भाऊ वारला. त्यानंतर मेधावीनी त्यांना लग्नाची मागणी घातली. मेधावी मागास जातीतील होते. रमाबाईंनी कसलाही विचार केला नाही. लग्नाला होकार दिला. त्यांचा नोंदणी पद्धतीने विवाह झाला. या लग्नाला खूप विरोध झाला. पण समाजाच्या विरोधाची त्यांनी कधी पर्वा केली नाही. एखादी गोष्ट पटली की त्या ती करत.

अशा या विवाहामुळे त्यांना जातीबाहेर काढले. पण ते दोघेही डगमगले नाहीत. मेधावी वकिलीसाठी जात त्यावेळी घरात असलेल्या बायबलचा अभ्यास बाईंनी सुरु केला. बायबलमधील चांगल्या तत्त्वांचा त्यांच्या मनावर परिणाम झाला. त्यावरून त्यांचे मेधावींशी खटके उडू लागले. मग त्यांनी बायबल शिकणे सोडून दिले. दरम्यान त्यांना एक मुलगी झाली. तिचे नाव त्यांनी मनोरमा ठेवले. ती लहान असतानाच मेधावी वारले. शवदहनाला कोणी येईना. शेवटी काही मित्र व विद्यार्थी पुढे आले. क्रियाकर्म उरकले.

रमाबाईंना लहान वयात आईबाप व पती या प्रिय व्यक्तिंच्या अंत्यविधीच्या वेळी प्रचंड छळाला तोंड द्यावे लागले. त्याचा खोल परिणाम त्यांच्या मनावर झाला. बहिष्कृत असल्यामुळे त्या मुंबईला आल्या. मुंबईला त्या येण्याअगोदरच त्यांच्या विद्वत्तेविषयी कळले होते. स्त्रियांची स्थिती सुधारावी म्हणून त्या काम करतात हे लोकांना माहीत झाले होते. तिथेही त्यांचे स्वागत झाले.

स्त्रियांसाठी काहीतरी करावे ही त्यांची तळमळ वाढत गेली. बालविधवांच्या करुण कहाण्या त्यांच्या कानी पडत होत्या. लोकांनी त्यांची व्याख्याने आयोजित केली. पुण्यातील व्याख्यानाला त्यांनी अट घातली. पुरुषांनी आपल्याबरोबर घरातील एकातरी स्त्रीला आणलेच पाहिजे, तरच पुरुषांना रांगेत बसता येईल! स्त्रियांच्या अवनतीबाबत लोकजागृतीचा त्यांनी सपाटाच लावला. महाराष्ट्रभर दौरे केले. दारू व तंबाखूच्या व्यसनाविरोधी सोलापूरला व्याख्यान दिले. 'चिरुट ओढणारा तो एक दाताचा डुक्कर' असे त्या त्वेषाने म्हणत.

हंटर आयोगासमोर निवेदन

इंग्रजांनी एक आयोग नेमला होता. हंटरसाहेब हे त्याचे अध्यक्ष. म्हणून त्या आयोगाचे नाव हंटर आयोग पडले. या आयोगासमोर आपले म्हणणे मांडायला कोणी पुढे येईना. तेव्हा रमाबाई पुढे आल्या. इथल्या महिलांची परिस्थिती त्यांनी सांगितली. त्यासाठी त्यांनी १८८१ सालच्या शिरगणतीचा अभ्यास केला. किती कमी स्त्रिया साक्षर आहेत तसेच बालविधवांचे प्रमाण केवढे मोठे आहे हे सर्व सांगितले. पुरूष डॉक्टरांकडे

आपल्या तब्येतीविषयी महिलांना मोकळेपणाने मांडता येत नाही. तरी वैद्यकशास्त्र महिलांना शिकवणे किती गरजेचे आहे हे मांडले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर महिलांचे मृत्यू थांबतील असे ठासून सांगितले. इंग्लंडला हंटरसाहेबानी तशी शिफारस केली. त्यानंतर काही ठिकाणी महिलांना वैद्यक शिकवायची सोय झाली.

त्या काळात १४ वर्षांखालील विधवांची संख्या खूप होती. लाखो मुलींवर अतिशय केविलवाणे जिणे लादले होते. मृत्यूशिवाय त्यांची सुटकाच नसे. अशा स्त्रियांना स्वत:च्या पायावर उभे करावे असे रमाबाईंना वाटे. या स्त्रियांसाठी एक आश्रम उभारावा म्हणून त्यांनी खूप खटपट केली. सहा महिने देणगी गोळा करण्यासाठी हिंडल्या, पण काही उपयोग झाला नाही. कोणी देणगी देईना. मग त्यांनी स्वत:च परदेशी जाऊन डॉक्टर व्हायचे ठरवले. परदेशी जायचे तर पैसा हवा. मग त्यांनी एक पुस्तक



लिहिले. 'स्त्री - धर्म - नीती' हे ते पुस्तक. त्याची विक्री करून त्यांनी पैसा मिळवला. छोट्या मनोरमेला घेऊन त्या इंग्लडला गेल्या. तेव्हा समुद्र

ओलांडणेसुद्धा पाप समजले जाई.

लवकरच त्या इंग्रजी शिकल्या. गणित, विज्ञान या विषयांबरोबर त्या बायबलही शिकल्या. बायबलवरची विविध पुस्तके वाचली. वेगवेगळी मते बघून त्या भांबावून गेल्या. त्यांनी बायबलच्या मूळ ग्रंथाचे वाचन केले. मग त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. इंग्लंडमध्ये त्यांनी हलाखीने गांजलेल्या स्त्रियांसाठी चाललेले काम पाहिले. भारतातील उलट परिस्थिती त्यांना जाणवली. 'स्त्रिया फार पातकी असून त्यांना कोल्हया - कुत्र्यासमोर टाकावे' असे स्मृतिकार म्हणतात. त्या उलट येशूने अशांना प्रेमाने तारले आहे असे ग्रंथात जागोजागी दाखवले आहे. या सर्व कारणांमुळे त्या ख्रिस्ती धर्माकडे ओढल्या गेल्या. परंतु त्यांनी कधी मांस खाल्ले नाही. कांदा लसूण खाल्ला नाही. ख्रिश्चन होऊनही इथे आल्यावर इथल्या इंग्रजी साहेबाची कधी हांजी हांजी केली नाही. पोषाखात बदल झाला नाही, आपले नावही बदलले नाही.

ख्रिश्चन झाल्यामुळे पेपरमधून त्यांच्या विरूद्ध खूप झोड उठली. पण त्या भ्याल्या नाहीत. त्यांनी बदनामी विरूद्ध खटला भरला. ती केस त्यांनी जिंकली व पेपरवाल्यांना त्यांची माफी मागावी लागली. रमाबाई धैर्यवान होत्या. मनापासून पटल्यावर एखादी गोष्ट त्या निश्चयाने पार पाडत. सत्य लपवून ठेवत नसत.

आनंदीबाई जोशी या भारतातल्या पहिल्या महिला डॉक्टर. त्यांचा पदवीदान समारंभ अमेरिकेत होणार होता. त्याला रमाबाईंना बोलावणे गेले. त्या अमेरिकेला गेल्या. मुलीला इंग्लंडमध्ये ठेवून त्या एकट्याच गेल्या. तिथे पदवीदान समारंभानंतर दुसऱ्या दिवशी त्यांच्या सभेचा कार्यक्रम झाला. सभेला खूप गर्दी झाली. त्यांनी इंग्रजीमध्ये भाषण करून सर्वांवर छाप पाडली. तिथे महिलांची प्रगती पाहिली. सर्व क्षेत्रात

महिलांचा वावर पाहिला. त्यांनी तिथेच राहून तेथील समाजाचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. तीन वर्षे त्या तिथे राहिल्या. तीस हजार किलोमीटर प्रवास केला. अमेरिकेत महिलांनी दारूविरोधी आंदोलन सुरू केले होते. त्यात त्या हिरीरीने सहभागी झाल्या.

तिथे भारतातील स्त्रियांची परिस्थिती भाषणातून लोकांसमोर ठेवली. तसेच इंग्रजीतून 'हिंदू उच्चवर्णीय स्त्रिया' नावाचे पुस्तक लिहिले. ते खूप गाजले. त्याचा प्रसार करून अमेरिकेत त्यांनी भारतातील स्त्रियांविषयी सहानभूती निर्माण केली. त्या पुस्तकातून जे पैसे मिळाले त्यातून बालवाडीसाठी तक्ते खरेदी केले. त्या बालवाडीचा कोर्स शिकल्या. त्यांच्या पुस्तकामुळे व त्यांच्या भाषणांमुळे तेथील लोक प्रभावित झाले. भारतातील विधवा, निराधार महिलांच्या उन्नतीसाठी संस्था काढण्याची कल्पना सांगितली. रमाबाई असोसिएशन नावाची संस्था काढून अमेरिकेतून प्रचंड मदत गोळा केली. पुढील दहा वर्षे ही मदत मिळणार होती. त्यानंतरच त्या भारतात परतल्या.

१८८९ साली रमाबाई भारतात आल्या. मुंबईत त्यांची संस्था एका छोट्या भाड्याच्या घरात सुरू झाली. संस्थेच्या उद्घाटनाच्या वेळी काशिबाई कानिटकर यांना अध्यक्ष केले. सभेच्या अध्यक्षस्थानी स्त्री असण्याची भारतातील ही पहिलीच वेळ. या सभेला लोकांनी खूप गर्दी केली होती. शारदा ही विद्येची देवी. शिक्षण व घर (सदर) यांचा संगम रमाबाईंना साधायचा होता. म्हणून या शाळेला त्यांनी 'शारदा सदन' नाव दिले. दोन विधवा मुलींना घेऊन ही शाळा सुरू झाली. शारदा गद्रे व गोदूताई जोशी. गोदूताईने संस्थेत राहावे यासाठी त्यांनी युक्ती केली. गावी कामाला एक गडी ठेवण्यास लावले. त्याचे वर्षाला ५० रुपये देण्याचे रमाबाईंनी मान्य केले. आलेल्या मुलीला परत पाठवायची नाही हा हेतू.

हळूहळू मुलींची संख्या वाढू लागली.



पुण्याची हवा चांगली म्हणून थोड्याच दिवसांत संस्था पुण्याला हलवली. पुण्यातून खरं तर फार विरोध होत होता. पण तरीही आगाखान पॅलेस येथे मुलींना आणले. नंतर स्वतंत्र, ऐसपैस बंगला घेतला. मुलींची संख्या ६४ झाली. मुलींना येथे शिक्षण दिले जाई. त्याचबरोबर पक्ष्यांचे, फुलांचे निरीक्षण करण्यास शिकवले जाई. पहाटे उठून नक्षत्र, तारेही दुर्बिणीतून दाखवले जात. त्याबाबत स्वत: रमाबाई मुलींना सर्व माहिती देत. खाण्यापिण्याची व्यवस्थाही चांगली होती. मुलींना अगदी घरच्यासारखे प्रेम मिळे. त्यामुळे सदनात आल्या की मुली फुलपाखरासारख्या बागडायला लागत. पण समाजाला तेही मान्य नव्हते. बालविधवांनी आनंदी राहावे हे लोकांना पटत नसे. तशी टीकाही त्यांच्यावर झाली. पेपरमधून लोकांनी घाणेरडे आरोप केले. पण रमाबाईंनी मुलींवरचे प्रेम कमी केले नाही.

महिलांना मायेचा आधार

त्या काळात बालविधवांना खूप वाईट अनुभव यायचे. जिऊ ही ९ वर्षांची अशीच एक बालविधवा. तिच्या नवऱ्याची मालमत्ता सासरच्यांनी हडप केली. तिचा प्रचंड छळ केला. जनावरे चारायला रोज रानात जायची. गावात एकदा मिशनऱ्याचे प्रवचन ऐकायला गेली, म्हणून तिला खूप बदडले. शेवटी नदीवर जीव द्यायला गेली. पण पोहता येत असल्यानं पोहत जंगलात पोचली. रात्रभर गुहेत राहिली. शेवटी पोलिसांनी तिला सदनात आणून सोडली. याच जिऊला चांगले शिकवून धीट केले. अमेरिकेला पाठवले. परत आल्यावर तिने रमाबाईंच्या कामात मदत केली.

अशाच एका तारा नावाच्या विधवेचा छळ होई. कोणीतरी एका निनावी पत्रातून तिच्याबद्दल कळवले. तेव्हा शारदा सदनच्या कार्यकर्त्या गावात गुपचूप गेल्या. मुसलमानी पेहेराव करून रातोरात तिला गावातून हलवले व सदनात आणले. अशा कितीतरी विधवा मुलींना रमाबाईंनी आधार दिला, शिकवले, स्वत:च्या पायावर उभे केले.

रमाबाई रोज रात्री झोपताना खोलीत प्रार्थना करत. हळूहळू त्या प्रार्थनेला मुली जमू लागल्या. ख्रिस्ती धर्माबद्दल त्यांना कळल्यावर काहीजणी आपणहून ख्रिस्ती झाल्या. सनातनी, जुन्या विचारांच्या पुढाऱ्यांनी टिकेची झोड उठवली. परंतु रमाबाईंनी त्याला उत्तर दिले. संस्थेत कोणत्याही धर्माचा प्रचार करायचा नाही अशी अट संस्था काढतानाच रमाबाईंनी घालायला लावली होती. तरी लोकांचा विश्वास बसेना. रात्री मुलींना खोलीचे दार बंद करावे असे सुचवले. परंतु रमाबाईंनी मुलींसाठी सर्व वेळ दिला होता. त्यांनी त्यांचा दिनक्रम बदलला नाही. पालकांनी मात्र त्यांना पाठिंबा दिला. मुलींना चांगले वागवले जात आहे, सक्ती केली जात नाही असे पेपरमध्ये जाहीर केले. एका सोवळ्या

ब्राह्मणाने सुटीसाठी मुलीला घरी नेले होते. शाळा सुरू झाल्यानंतर त्याने तिला सदनात पाठवले, आणि तिच्याबरोबर शेजारच्या विधवा मुलीलाही आणून सोडले!

महर्षी कर्वे यांची पत्नी आनंदीबाई. कर्व्यांनी असे म्हटले आहे की सदनाच्या शिकवणुकीमुळे सुसंस्कृत व विशाल हृदयाची पत्नी मिळाली. रमाबाईंच्या प्रेरणेमुळे आनंदीबाईंनी पुढे महिलांसाठी कार्य केले.

मुंबईहून शारदासदन पुण्याला हलवल्यानंतर तिथे दुसरी संस्था काढली. रमाबाईंना मदत करणाऱ्या शेवंताबाईंनी त्यासाठी पुढाकार घेतला. सदनाच्या कामामुळे बालवाडीचा (किंडरगार्टन) प्रसार संपूर्ण मुंबईत झाला.

राजकारणाचे पहिले धडे

१८९५ साली पुण्यात काँग्रेसचे अधिवेशन होते. त्यासाठी महिलांनी प्रतिनिधी म्हणून जावे असा प्रयत्न रमाबाईंनी केला. पुढाऱ्यांच्या बायकांना पटवण्याचा प्रयत्न केला. पण कोणी तयार होईना. शेवटी सदनातील महिलांशी चर्चा केली. या अधिवेशनाला ९ प्रतिनिधी हजर राहिल्या. महिलांचा राजकारणातील हा पहिला सहभाग! रमाबाईंनी अधिवेशनात विधवांचे केशवपण (मुंडण) विरोधी ठरावाला अनुमोदन दिले. त्यांचे भाषण खूप गाजले. जाहीर सभेतही विधवांना स्वावलंबी करण्याविषयी त्या बोलल्या.

शाळेत इंग्रजी शिकवताना राणीची गाणी शिकवली जात. पण स्वत:च्या आईला लाथा मारायला शिकवणारे हे शिक्षण त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी हिंदी भाषेचा पुरस्कार केला. सुबोध, सोप्या देवनागरी लिपीचाही पुरस्कार केला. बहुजन समाजाला सर्व काही कळले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. अधिवेशनात हिंदी राष्ट्रभाषेचा आग्रह धरणारी ही

पहिली स्त्री!

इंग्रज अधिकाऱ्यांना जाब विचारला!

अमेरिकेतून येणारी मदत दहा वर्षांकरता होती. पाच वर्षे संपली. परंतु भारतात त्यांना कोणी मदत देईना. पुढे संस्था कशी चालवायची? म्हणून पुण्याजवळ केडगांवला १०० एकर बरड जमीन घेतली. शेती करून तरी मुलींचे संगोपन करता येईल हा हेतू. दरम्यान पुण्यात प्लेगची साथ सुरू झाली. लगेच सर्वजणींना केडगांवला हलवले. झोपड्या बांधून त्यांना काही दिवस तेथे ठेवले. परंतु काही मुलींना लागण झाली. उपचारासाठी ससूनला हलवले. तिथला गलिच्छपणा व वाईट वागणूक पाहिली. पुण्याच्या कलेक्टरला भेटल्या. तो दाद देईना. मुंबईच्या गव्हर्नरला पत्र लिहीले. उपयोग झाला नाही. शेवटी पेपरमध्ये जाहीर लेख लिहीला. या लेखावरून ब्रिटीश संसदेत चर्चा झाली. इथल्या अधिकाऱ्यांवर संसदेत टीका झाली. तेव्हा त्यांनी धावपळ करून काही सुधारणा केल्या.

दुष्काळ पीडितांना मदत

१८९७ ला मध्यप्रदेशमध्ये भयंकर दुष्काळ पडला. उपासमार, मृत्यूने थैमान घातले. रमाबाईंनी लहानपणी दहा दिवस झाडाचा पाला खाऊन दिवस काढले होते. उपाशी राहिल्याने आई वारली. त्यांना उपासमारीच्या यातना ठाऊक होत्या. म्हणून लगेच दुष्काळपीडितांना मदत करायचे ठरवले. काहीजणींना घेऊन त्या मध्यप्रदेशला गेल्या. तिथे त्यांनी काय पाहिले? मुंबई, कलकत्त्याच्या गुंडांनी तेथे व्यापार चालवला होता. हे गुंड स्त्रियांची विक्री करत. भाकरीच्या पीठाकरता आईवडील मुलीला विकत. डॉक्टरांची व अधिकाऱ्यांची पाठ वळली की या मदत छावण्यांमध्ये (रिलफ कॅंप) हैदोस चाले. अशा ३००० स्त्रियांना त्या नरकयातनांतून काढून केडगांवला आणले.



जवळ पैसा नाही, मदत मिळण्याची शक्यता नाही. पण रमाबाई डगमगल्या नाहीत. हाडांचे सांगाडे झालेल्या, रोगी, अपंग, निराश्रित स्त्रियांना आसरा दिला. या महिलांची खरुज साफ करणे, डोक्यातील उवा काढणे हे त्या स्वत: करत. त्यांचे पाहून सदनातील इतर मुली मदतीचा धावल्या. जातपात न पाळता सर्वजणांची प्रेमाने काळजी घेतली. दुष्काळातील महिलांच्या या विभागाला 'मुक्ती सदन' हे नाव दिले.

दहा वर्षे संपली. परंतु महाराष्ट्रातून या आश्रमाला मदत मिळेना. मग १८९८ ला नाईलाजाने रमाबाई परत अमेरिकेला गेल्या. यावेळी मात्र 'अमेरिकन रमाबाई असोसिएशन' ही ख्रिश्चन संस्था स्थापन केली. या संस्थेने केडगावच्या शारदा सदनची पूर्ण जबाबदारी घेतली. तरीदेखील जबरदस्तीने कोणालाही ख्रिस्ती केले नाही. ख्रिस्ती धर्म शिक्षणाला तासाला कोणी गैरहजर राहिली तरी चाले.

यानंतर १९०० साली गुजराथेत मोठा दुष्काळ पडला. रमाबाईंनी तिथूनही मुलींना, बायकांना आणले. मध्यप्रदेशच्या मुलींनी त्यांची सेवा केली. निरक्षरता, अज्ञान व चोऱ्या करण्याची वाईट सवय हे घालवणे किती

कठीण? परंतु कडक शिस्त आणि समान वागणूक व प्रेम याच्या जोरावर रमाबाईंनी सर्वांचा सांभाळ केला. संस्था ख्रिस्ती होती तरी जुन्या रिवाजाप्रमाणे राहणाऱ्या हिंदू विधवाही तिथे होत्या.


स्वावलंबनातून स्वाभिमान

संस्थेचा व्याप वाढायला लागला. अशावेळी प्रथम गरज होती पाण्याची. लगेच सुरुंग लावून १२ विहीरी खोदल्या. ४० एकर जमीन पाण्याखाली आणली. विहीरीतून निघालेल्या दगडातून उपासना मंदिर बांधले. इंग्लंडमध्ये एक बाई साधेपणाने आयुष्य जगली. तिने आपली सारी मालमत्ता सदनाला दिली. त्यातून जनरेटर आणला. सदनातील महिलांनी जमवलेल्या पैशातून विजेचे खांब, तारा इ. आणले. संपूर्ण परिसर प्रकाशित केला. संस्थेची मोठी इमारत बांधली. दवाखाना व स्वतंत्र प्रयोगशाळाही काढली.

त्यांच्या आश्रमासमोर एक ताडवन होते. तिथे एकाला दारू विक्रीचा परवाना मिळाल्याचे कळले. लगेच रमाबाई कलेक्टरला भेटल्या. त्याच्यावर मनाई हुकूम मिळवला. ते वन त्यांनी विकत घेतले. ताडाची झाडे साफ केली. तिथे आठवडी बाजार भरण्याची व्यवस्था केली. पुढे पुढे आश्रमातल्या मुलीही तेथे माल विकू लागल्या.

मुलींनी स्वावलंबी व्हावे यावर रमाबाईंचा भर होता. त्यासाठी त्यांनी छापखाना काढला. टाईप जुळवणे, कागद मोडणे, पुस्तके बांधणे अशी सर्व कामे स्त्रिया शिकल्या. शंभर मुली येथे कामाला होत्या. त्या शिवाय शेती, बुरूडकाम, विणकाम, घाणीवर तेल काढणे, टोप्या-बटणे करणे, कल्हईचे काम अशीही कामे मुली करू लागल्या. रमाबाईंनी सरकारी ऑर्डरी पण मिळवल्या. 'पुरूषांशिवाय सन्मानाने जगू शकतो असा आत्मविश्वास स्त्रियांमध्ये यायला हवा. मग पुरुषांचे वर्चस्व आपोआप कमी

होईल' असे रमाबाईंचे मत होते.



एवढ्यावर त्यांचे कार्य थांबले नाही. म्हाताऱ्या, वयस्कर स्त्रियांसाठी 'प्रीतीसदन' सुरू केले. अंधांसाठी 'बातमी सदन' सुरू केले येथे अंधांना ब्रेल लिपीतून वाचायला शिकवले जाई. लहान मुलांसाठी 'सदानंद सदन' उभारले. वेश्यावृत्तीत ढकलल्या गेलेल्या मुलींना सुधारण्यासाठी 'कृपासदन' सुरू केले. भारतातील अशा प्रकारची ही पहिलीच संस्था. 'कृपासदन'च्या कामाबद्दल त्यांना 'कैसर-ए-हिंद' सुवर्णपदक मिळाले.

सततच्या दगदगीने रमाबाई आजारी पडू लागल्या. त्यामुळे अमेरिकेत शिकायला असलेली मनोरमा पुण्याला आली. आईच्या कामात रात्रंदिवस मदत करु लागली. पुण्यातील शारदा सदन व केडगांवचे मुक्ती सदन दोन्हींची जबाबदारी तिने पेलली. तेव्हा ती केवळ २२ वर्षांची होती. पहाटे ४।। पासून ते रात्री उशीरा पर्यंत ती राबत असे. तशातच परदेश दौरा केला. तिथूनही कार्यकर्त्या मिळवल्या व त्यांना घेऊनच भारतात परतली. आईप्रमाणे तिचेही परदेशात खूप कौतुक झाले. परंतु तरुणपणीच हृदयविकाराने तिचा अंत झाला. रमाबाईंना फार दुःख झाले. मनोरमा नेहमी मुलींच्यात मिळूनमिसळून रहायची. त्यामुळे सदनातील

मुलींनाही खूप वाईट वाटले.

मनोरमा असतानाच शारदा सदन केडगांवला हलवले. अमेरिकन लोकांचा त्याला विरोध होता. त्यांची मदत कमी झाली. परंतु केडगांवला शेतीतून मिळणारे उत्पन्न होते. शिवाय पुणे-केडगांव येण्याजाण्याचा खर्च वाचला. त्याच्या जोरावर संस्था चालवायचा निर्णय केला. तसे अमेरिकेत कळवून टाकले. यावरून त्यांचा खंबीरपणा जाणवतो.

रमाबाई व मनोरमाच्या तालमीत स्त्रिया चांगल्याच तयार झाल्या. सौदामिनीबाई कारखाना प्रमुख होत्या. तर शेतीची सर्व जबाबदारी काशीबाईंवर होती. गंगाबाई, मीनाबाईंनी दुष्काळग्रस्त महिलांना आणून त्यांची सोय लावली. रमाबाईंच्या आतेबहिणीची सून रुक्मिणी ही बालविधवा. हिला सासरच्या छळातून सोडवली. कोठीची खोली रुक्मिणीच्या ताब्यात होती. रमाबाई नसताना सर्व सदनाची जबाबदारी सुंदराबाई सांभाळत. त्या उत्तम भाषण करत. ब्रिटिशांच्या उत्तेजनामुळे भारत व चीन यांच्यामध्ये अफूचा व्यापार चाले. त्या विरूद्ध जनमत जागृत करण्यासाठी सुंदराबाईंना लोकांनी चीनला नेले. कृष्णाबाई ही संस्थेत राहून मॅट्रीक झाली. परदेशी जाऊन तिने बी.ए. केले. नंतर मुंबईत बी.टी. होऊन सदनात शिक्षिका म्हणून काम पाहिले. यांनी पुढे रमाबाईंच्या नंतर संपूर्ण संस्था सांभाळली.

रमाबाईंचे लिखाण

'स्त्री-धर्म-निती' हे मराठी भाषेत महिलेने लिहिलेले पहिले पुस्तक! पतिनिधनानंतर पत्नीधर्माबद्दल त्यात लिहीले. 'इंग्लंडचा प्रवास' हे प्रवासवर्णन लिहीले. भारतातील स्त्रियांची परिस्थिती 'उच्चवर्णीय हिंदू स्त्रिया' या पुस्तकात प्रभावीपणे मांडली. या पुस्तकामुळे सदन चालवण्यासाठी १० वर्षे पैसे मिळाले. 'अमेरिकेतील लोकस्थिती' याविषयी त्यांनी पुस्तक लिहीले. त्यात त्यांचे सूक्ष्म निरीक्षण दिसून येते. अमेरिकेतील शासनपद्धती, धर्ममते, गृहस्थिती, शैक्षणिक पद्धती अशा सर्व गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. महिलांनी लावलेले शोध, त्यांची स्वतंत्र वृत्ती याचे वर्णनही पुस्तकात दिसते. कापणी व मळणी यंत्र, रेल्वे दुरुस्ती, वाफ बनवण्याचे यंत्र, पुरामुळे शेती वाहून जाऊ नये म्हणून केलेले उपाय अशा अनेक बारीक सारीक गोष्टी त्यांनी लिहील्या आहेत.

रमाबाईंना संस्कृत, इंग्रजी व मराठी भाषा उत्तम प्रकारे येत असत. बायबल बहुजन समाजापर्यंत पोचवण्यासाठी त्यांनी त्याचे मराठी भाषांतर करायचे ठरवले. मूळ बायबल कळावे म्हणून त्या हिब्रू व ग्रीक भाषा शिकल्या. 'जुना ' व 'नवा करार' समजावून घेतला. मग त्याचे मराठी व इंग्रजी भाषांतर केले. हे काम त्या १८ वर्षे करत होत्या. मुक्तिसदनातील छापखान्यातच ते छापले. त्यांनी ख्रिस्ती स्तोत्रे भारतीय संगीताच्या चालीत बसवून घेतली. नोटेशन सहित स्तोत्रांचे पुस्तक छापले. त्याचा उपयोग झाला. मुली नीट चालीत ती कवने म्हणू लागल्या.

ज्यादिवशी त्यांनी भाषांतराचे काम पूर्ण केले त्याच रात्री पहाटेच्या वेळी त्यांना शांतपणे मरण आले.

एका झंझावाती जीवनाचा अंत झाला.